03:54:05 PM

नि.फौ.ख. क्र.९४/२०१८
सरकार वि अनिल दांडेकर
निशाणी २५

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १**

| | | |
|---|---|---|
| **साक्षीदाराचे नाव** | :- | कमलबाई दत्तु दांडेकर |
| पतीचे **पुर्ण नाव** | :- | दत्तु विठ्ठल दांडेकर |
| **वय** | :- | ६५ वर्षे, |
| **व्यवसाय** | :- | शेती |
| **राहणार** | :- | निमडोंगरी, ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर |

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षांमार्फत सरकारी वकील श्री. एन.एस.बडगुजर यांच्यामार्फत**

**१.** मी निमडोंगरी येथे राहते. माझ्या घराच्या मागे पुतण्या अनिल दांडेकर राहतो. त्याच्या शेजारी अनिल गुळवे राहतात. २००३ साली पाणी भरता भरता मला माझा पुतण्या अनिल दांडेकर हा पाणी घेवू देत नव्हता. त्यानंतर मी माझ्या घरी आले. तर त्याने विटकर माझ्या डोक्यात हाणली. विटकर मारल्यामुळे माझ्या डोक्याला टाके पडले. मी दवाखान्यात गेले. विट मारल्यामुळे रक्त चालले म्हणून मला स्कार्फ बांधण्यात आला. तो मला म्हणाला की, मी तुझा जीव घेईल. त्याची आई त्याला म्हणाली की, त्यांना मारु नको. माझा मुलगा गावाच्या बाहेर राहतो. दुसरी माणसं आली त्यांनी सोडवासोड केली. त्याठिकाणी गोकुळ, कैलास, कारभारी आले होते. त्यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला आले. त्यांनी मला घाटीची चिठ्ठी दिली. त्यानंतर मला टाके देण्यात आले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेले. त्यानंतर पोलीस स्टेशनला वर्दी दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच असून त्याच्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **निशाण क्र.PW-1-26** देण्यात येते.

२. जो स्कार्फ डोक्याला बांधला होता तो दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेला स्कार्फ तोच आहे. स्कार्फला **आर्टिकल एम.ओ-१** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज कोर्टात हजर नाही.

## उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एन.बी.थोरात यांच्यामार्फत

३. माझ्या मुलाचे नाव हरी आहे. अनिलच्या आईचे नाव मनकरणाबाई आहे. हे खरे आहे की, हरी माझ्यापासून लांब राहतो. हे खरे आहे की, हरीविरुध्द मनकरणाबाई हिने रस्त्या संदर्भात प्रकरण टाकले होते. हे खरे आहे की, ते प्रकरण माझे पती दत्तू आणि हरीविरुध्द दाखल करण्यात आले होते. हे खरे आहे की, त्याबाबत रस्त्याबाबत अतिक्रमण केल्याबाबतचा आरोप माझ्या पती व मुलावर लावला होता. हे खरे आहे की, रस्त्याचा वाद जवळपास १५ वर्षापासून सुरु आहे. हे खरे आहे की, १५ वर्षापासून आमचे आपसात बोलणे चालणे नाही. हे खरे आहे की, आमचे ऐकमेकांकडे जाणे येणे नाही.

४. माझा पती माझ्यासोबत पोलीस स्टेशनला आला होता. माझा मुलगादेखील माझ्यासोबत होता. हे खरे आहे की, पोलीस स्टेशन येथे गेल्यावर माझा पती दत्तु आणि हरी हे पोलीस स्टेशनमध्ये गेले होते आणि त्यावेळेस मी बाहेर बसले होते. हे खरे आहे की, पोलीसांना तक्रारीतील मजकूर त्यांनी सांगितला व नंतर मला घेवून गेले व माझा अंगठा घेतले. हे खरे आहे की, तक्रारीत काय लिहलेले आहे हे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे ज्या विटकरीने मला मारले ती पोलीसांनी घेतली की नाही याची मला माहिती नाही.

५. हे खरे आहे की, बोळीला खेटून विश्वनाथ कचरु दांडेकर याचे घर आहे. हे खरे आहे की, गोकुळ, कारभारी आणि कैलास हे निमडोंगरीचे राहणार असल्यामुळे त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहे. हे खरे आहे की, त्यांच्याशी चांगले संबंध असल्यामुळे माझे पती दत्तु यांनी त्यांना साक्षीदार केलेले आहेत. हे खरे आहे की, मनकरणाबाई हिच्यासोबत माझ्या पतीचा रस्त्याचा जो वाद सुरु आहे तो वाद मिटवून घ्यावा अशी माझी इच्छा आहे. हे खरे आहे की, मनकरणाबाई आमचे ऐकायला तयार नाही. हे खरे आहे की, ती ऐकत नाही म्हणून नाइलाजास्तव पोलीसात जावून तक्रार द्यायला लागली.

६. हे खरे नाही की, अनिल दांडेकरने मला कोणतीही विट मारलेली नाही. हे खरे नाही की, मला कोणतीही रक्ताची जखम झाली नाही. हे खरे आहे की, पाणी भरताना चक्कर आल्यामुळे मी पडले होते. हे खरे आहे की, त्यामुळे, माझ्या डोक्याला लागले होते. हे खरे आहे की, डोक्याला लागल्यामुळे मी स्कार्फ बांधला होता. हे खरे आहे की, त्यावेळेस स्कार्फला रक्त लागले होते. हे खरे आहे की, त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. हे खरे आहे की, माझे पती दत्तु यांनी स्कार्फ पोलीस स्टेशनला दिला. हे खरे आहे की, त्यानंतर आम्ही घरी गेलो. हे खरे आहे की, त्यानंतर मी कुठेही गेले नाही.

७. हे खरे आहे की, अनिल हा मला काहीही म्हणाला नाही. हे खरे नाही की, माझी कोणतीही भांडण झाली नाही व त्याने मला धमकी दिली नाही. हे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.10.03 11:20:35 +0530

**(वि. द. पाटील)**

दि.०३/१०/२०२५ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

04:24:16 PM **कन्नड**

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 03.10.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 03.10.2025 |
| Order uploaded on | 03.10.2025 |